(30)

स्थापना : २४/०३/२०१७

।। हे सृष्टी मै तेरा आभारी हूँ ।।

रजि.नं. महाराष्ट्र/३६२६२/को.

# झाड फौंडेशन

www.zaadfoundation.com पिशवी, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर. मो. ९०९६६०६६५४. Email - zaadfoundation69@gmail.com

जावक क्र.

दि. :२०/५/२०१८

प्रति,

**मा. सरपंच/ग्रामसेवकसो**

ग्रामपंचायत पिशवी,

ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

विषय : १. मौजे पिशवी गायरान जमीन गट क्र. ११९७ देवमाळ उद्यान मधील पर्यावरण पुरक उपक्रम व नैसर्गिक संसाधनाचा ऱ्हास होऊ नये याची दक्षता घेणेबाबत...

२. घण कचऱ्याचे विघटन, विल्हेवाट, जुना मलबा इ. योग्य नियोजन लावणेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन मौजे पिशवी स्थित सध्या लोकसहभागातून पहिल्यांदाच दोन ऐतिहासिक कामे होत आहेत व ती खूप कौतुकास्पद आहेत. एक म्हणजे गायराण स्थित पर्यावरण पुरक 'एक गाव एक उद्यान' प्रकल्प व 'ग्रामदेवतेचे भव्य मंदिर' यासाठी स्थानिक पातळीवर ग्रामस्थांकडून चांगल्याप्रकारे सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. ही आनंदाची गोष्ट आहे. हे दोन्ही उपक्रम सामान्य माणसाशी निगडीत आहेत. परंतु भविष्यात अशा प्रकारचे कोणतेही सामाजिक कार्य करत असताना पर्यावरणाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची काळजी घेणे जरुरीचे आहे.

सदर विषयानुसार मौजे पिशवी गायरान गट क्र. ११९७ मध्ये सन जून २०१६ पासून 'झाड फौंडेशन व हरित सेना' यांचेमार्फत पर्यावरण पूरक प्रकल्प 'एक गाव एक उद्यान' (ऑक्सिजन विरंगुळा पार्क) चांगल्या प्रकारे राबविला जात आहे. सध्याच्या वातावरणातील बदलामुळे ही काळाची गरज आहे. झाड फौंडेशन, हरित सेना व पिशवी ग्रामस्थ इ.नी या

Scanned by CamScanner

उपक्रमात आत्तापर्यंत खूप महेनत घेतली आहे व वर्तमानस्थितीत काम चालू आहे.

महोदय, विशेष गोष्ट सज्ञान मध्ये घेण्याजोगी म्हणजे भविष्याच्या दृष्टीने पिशवी गायरान हे गावच्या एकूण क्षेत्रांपैकी अत्यंत अल्प प्रमाणात शिल्लक आहे. हे गावातील लोकांच्या सार्वजनिक वापरासाठी एकमेव स्वच्छ वातावरणाचे ठिकाण आहे. याठिकाणी लहान मुले, शालेय मुले, युवक, वृद्ध, महिला व्यायाम व विरंगुळ्यासाठी येतात. या ठिकाणी भरपूर प्रमाणात वृक्षारोपण झालेले आहे तसेच भविष्यातही मोठ्याप्रमाणात वृक्षारोपण होणार आहे. सदर जागेची आधीच खूप प्रमाणात हानी झालेली आहे.

**वरील सर्व गोष्टी सज्ञानमध्ये घेऊन कोणत्याही सामाजिक कार्यासाठी नैसर्गिक संसाधनाचे नुकसान होऊ नये. तसेच घण कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करावे, मुरुम उपसा होऊ देऊ नये, जुना मलबा इतरत्र टाकू नये इ. गोष्टींची काळजी घ्यावी व सर्व गोष्टींचे योग्य नियोजन करावे आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यास सहयोग करावा, ही विनंती.**

कळावे,

आपले नम्र,

**सल्लागार** **सचिव** **अध्यक्ष**

# झाड फौंडेशन

www.zaadfoundation.com पिशवी, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर. मो. ९०९६६०६६५४. Email - zaadfoundation69@gmail.com


जावक क्र.

दि. :२०/०५/२०१९

प्रति,

श्री पिसाईदेवी देवस्थान उपसमिती.

मौजे पिशवी,

ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

विषय : १. मौजे पिशवी गायरान जमीन गट क्र. ११९७ देवमाळ उद्यान मधील पर्यावरण पुरक उपक्रम व नैसर्गिक संसाधनाचा ऱ्हास होऊ नये याची दक्षता घेणेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन मौजे पिशवी स्थित सध्या लोकसहभागातून पहिल्यांदाच दोन ऐतिहासिक कामे होत आहेत व ती खूप कौतुकास्पद आहेत. एक म्हणजे गायराण स्थित पर्यावरण पुरक 'एक गाव एक उद्यान' प्रकल्प व 'ग्रामदेवतेचे भव्य मंदिर' यासाठी स्थानिक पातळीवर ग्रामस्थांकडून चांगल्याप्रकारे सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. ही आनंदाची गोष्ट आहे. हे दोन्ही उपक्रम सामान्य माणसाशी निगडीत आहेत. परंतु भविष्यात अशा प्रकारचे कोणतेही सामाजिक कार्य करत असताना पर्यावरणाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची काळजी घेणे जरुरीचे आहे.

सदर विषयानुसार मौजे पिशवी गायरान गट क्र. ११९७ मध्ये सन जून २०१६ पासून 'झाड फौंडेशन व हरित सेना' यांचेमार्फत पर्यावरण पूरक प्रकल्प 'एक गाव एक उद्यान' (ऑक्सिजन विरंगुळा पार्क) चांगल्या प्रकारे राबविला जात आहे. सध्याच्या वातावरणातील बदलामुळे ही काळाची गरज आहे. झाड फौंडेशन, हरित सेना व पिशवी ग्रामस्थ इ.नी या उपक्रमात आत्तापर्यंत खूप महेनत घेतली आहे व वर्तमानस्थितीत काम चालू आहे.

Scanned by CamScanner